Establish Year - 2010

"Vidya Vinayen Shobhate"

Shri Keshavraj Shikshan Santha's

# Pavansut English Medium School

Markal, Tal.Khed, Dist. Pune 412105

शाळा परवानगी क्रमांक -शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवी२०१४/११३२७/३०

शाळा मान्यता (प्राथमिक) - शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/१८/२९७ दि.४/८/२०१८

शाळा मान्यता (माध्यमिक) - शिउसं/माध्य-३०२/प्र.मा./पुवि/२०१९/२००९ दि.११/०३/२०१९

S.S.C. Code 11.08.083

Center No 1289

E-mail pemsmarkal@gmai

UDISE NO 27250816410

## –:सभा अजिंडापत्र :–

शिक्षक पालक संघ
पवनसूत इंग्लिश मिडियम स्कूल
मरकळ
मिटींग क– 01 / 2023–2024
दिनांक 23 / 06 / 2023

सर्व इ.1ली ते इ.10वी च्या सन्माननीय पालक व शिक्षक सभासदांना कळविण्यात येते की शुक्रवार दिनांक 23 / 06 / 2023 रोजी सकाळी 10.30 वाजता खालील विषयांवर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी शिक्षक पालक सभा आयोजित करण्यात येत आहे.तरी सर्व पालक व शिक्षक सभासदांनी सभेला उपस्थित रहावे ही विनंती.

कोरम अभावी ही सभा तहकूब करावी लागली तर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी11.00 वाजता सुरू करण्यात येईल.कोरमची आवश्यकता राहणार नाही

**!सभेचेस्थळ !**
**मुख्याध्यापक कार्यालय,**
**पवनसूत इंग्लिश मिडियम स्कुल,मरकळ**
**मरकळ,ता.खेड,जि.पुणे.**

**सचिव**
पवनसूत इंग्लिश मिडियम स्कुल,

**अध्यक्ष**
पवनसूत इंग्लिश मिडियम स्कुल,

**<u>सभेपुढीलविषयः–</u>**

1) मागील सभेचा अहवाल वाचून कायम करणे.
2) सन 2023–24 करिता पालक प्रतिनिधी निवड करणे व प्रत्येक वर्गातून सभासद करून घेणे.
3) सन 2023–24 करिता शिक्षक पालक संघाची स्थापना करणे.
4) शिक्षक पालक संघाची रचना व कर्तव्यांची माहिती देणे.
5) शालेय व्यवस्थापन समिती तयार करणे
6) शैक्षणिक वर्ष 2023–24 चा वर्ग फी निश्चित करणे.
7) शैक्षणीक वर्ष 2023–24 RTE 25% प्रवेशाबाबत व फी बाबत माहिती देणे .
8) शैक्षणिक वर्ष 2023–24 साठी स्टेशनरी वहया व पुस्तके खरेदीस मान्यता देणे.
9) परिवहन समिती तयार करणे व वाहतुकदार व प्राचार्य यांत करार करणे.
10) विदयार्थी शालेय ड्रेस विषयी माहिती देणे.
11) शिक्षक पालक संघची वार्षिक फी संदर्भात माहिती घेणे.
12)मा.अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर निर्णय घेणे .

प्रत :–
मा.श्री.______________________________

**पवनसूत इंग्लिश मेडियम स्कुल,मरकळ,**

# शिक्षक पालक संघ सभा क्र. १
## (२०२३-२४)

२३।०६।२३

आज दि. २३।०६।२०२३ रोजी सकाळी १०:३० वा. शिक्षक पालक संघाची सर्वसाधारण सभा घेण्यात आली.

सभेमध्ये पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली.

सभेपुढील विषय :-

१) मागील सभेचा अहवाल वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२४ करिता पालक प्रतिनिधी निवड करणे.
३) सन २०२३-२४ करिता पालक संघाची निवड करणे.
४) शिक्षक पालक - संघाची रचना व कर्तव्यांची माहिती देणे.
५) शालेय व्यवस्थापन समिती तयार करणे.
६) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या वर्ग फी निश्चित करणे.
७) शै. वर्ष २०२३-२४ RTE २५% प्रवेशाबाबत व फी बाबत माहिती देणे.
८) शै. वर्ष २०२३-२४ साठी स्टेशनरी वह्या व पुस्तके खरेदीस मान्यता देणे.
९) परिवहन समिती तयार करणे व वाहतुकदार व प्राचार्य यांत करार करणे.
१०) विद्यार्थी शालेय ड्रेस विषयी माहिती देणे.
११) शिक्षक पालक संघाची वार्षिक फी संदर्भात माहिती देणे.
१२) मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर निर्णय घेणे.

ठराव क्र. १
मागील सभेचा अहवाल वाचून कायम करणे.
मागील सभेचा अहवाल अध्यक्षांच्या परवानगीने श्री. कुलकर्णी सर यांनी वाचून दाखविला. ठराव सर्वांमध्ये मंजूर करण्यात आला.

ठराव क्र. २
सन २०२२-२३ मधील दहावीच्या निकालाबाबत शिक्षकांचे कौतुक
मार्च २०२२-२३ मध्ये झालेल्या S.S.C. परिक्षेमध्ये १००% निकाल लागल्याने शाळेचे नाव उंचावले. यासाठी शिक्षकांचे व शाळेचे अभिनंदन करण्यात आले.

ठराव क्र. ३
पालक संघाची निवड व स्थापना करणे.
सभेमध्ये स्वइच्छेने व सर्वानुमते पुढीलप्रमाणे सदस्यांची निवड करण्यात आली.
अध्यक्ष :- श्री ज्युलीमेरी बार्नबस (मुख्याध्यापिका)
उपाध्यक्ष :- मा. श्री. विनोद विठ्ठल वहीले
सचिव :- मा. श्री/ सौ. गौरी गुरव-जोशी
सहसचिव :- मा. सौ. नैना सुनिल वर्पे
सौ. मीरा भानुदास चव्हाण
सरपंच मा. श्री. भानुदास लोखंडे

ठराव क्र. ४
पालक संघाची रचना व कर्तव्याची माहिती, वार्षिक फि
शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे पालक हे सभासद असतातच. परंतु जे पालक शिक्षक व पालक व विद्यार्थी यांमध्ये सुसंवाद घडवून आणतील, अशा पालकांनी शिक्षक-पालक संघात सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच शाळेच्या कामकाजात येणाऱ्या अडचणी वर (शिक्षक पालक यांतील अडचणी) सोडविण्यास मदत करतील, अशा पालकांनी सहभाग घ्यावा.

शिक्षक पालक संघासाठी नाममात्र रु. ५०/- हे प्रत्येक पालकांकडून आकारण्यात आली आहे. ज्या पालकांचे दोन पाल्य असतील त्यांनी एका पाल्याची फि भरावी.

ठराव क्र. ५
शै. वर्षे २०२३-२४ ची फी निश्चित करणे.
शै. वर्षे २०२३-२४ संस्थेने फि वाढ घोषित केली नाही. त्याबद्दल संस्थेचे पालकांकडून अभिनंदन करण्यात आले. नर्सरी, LKG, UKG. या वर्गासाठी ७५०/- रु प्रत्येकी वाढ करण्यात आली. । ते १०वी वर्गासाठी वाढ नाही.

ठराव क्र. ६
सन २०२३-२४ RTE प्रवेशाबाबत
शासन निर्णयानुसार RTE (२५%) मध्ये प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांस / विद्यार्थ्यांकडून शाळा फि घेत नाही. परंतु गेल्या ५ वर्षांपासून आपल्या शाळेस शासनाकडून फि आली नाही. काही कारणास्तव RTE कडून फि साठी नकार देण्यात आला. यासाठी संस्थेने असे ठरवले होते कि विद्यार्थ्यांनी संपूर्ण फि धनादेशने (Cheque) ने भरणे. जेव्हा शासनाकडून ~~पाल्य~~ विद्यार्थ्यांची फि भरली जाईल तेव्हा पालकांस धनादेश परत करण्यात येईल. परंतु संस्थेच्या या निर्णयास पालकांनी नकार दिला. पालक संघातील काही उत्साही पालक शाळेचे पत्रक घेऊन शासनाकडे RTE च्या विद्यार्थ्यांची फि माफ व्हावी, यासाठी जाणार आहेत / जातील. शाळेने पालकांना पत्र देण्यास तयार आहे. अशी चर्चा या ठरावाबद्दल झाली.

ठराव क्र. ७
परिवहन समिती व वाहतुकदार यांस करार
शै. वर्षे २०२३-२४ मधील परिवहन समिती निर्माण करण्यात आली.
अध्यक्ष :- मा. श्री. ज्युलिमेरी बार्नबस
मा. श्री. भानुदास लोखंडे